**एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ,**
**मुंबई - 400 020.**

आस्थापना/नस्ती-/2020 -21/    दि. मार्च 27, 2020

**तात्काळ व महत्वाचे**

**विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रदुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय**

संदर्भ : 1. मा. सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, यांचे कडील पत्र दि. 21.03.2020
2. मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. F. No. 1-14/2020 दि. 21.03.2020
3. शासन निर्णय क्र. संकिर्ण-2020/ प्र. क्र. 60/20/ तांशि-1 दि. 19.03.2020
4. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ कोरोना/मावि - 1/2020/3819/4042 दि. 19.03.2020
5. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. आरईजी/142/2019-20/437 दि. 19.03.2020
6. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. आस्थापना/नस्ती-/2020-21 दि. 22.03.2020
7. गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. 40-3/2020/DM-I (A) दि. 24.03.2020
8. महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. DMU/2020/CR. 92/DisM-1, दि. 25.03.2020

**परिपत्रक**

**प्रति,**

**सर्व विभाग प्रमुख, प्राचार्य, संचलित व संलग्नित महाविद्यालये, संचालक, मान्यता प्राप्त संस्था ई.**
**एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ.**

कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) अटकाव व्हावा म्हणून मा. सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व मा. शिक्षक संचालक, उ. शि., पुणे यांचे कडून संदर्भ क्र. 1 ते 4 च्या पत्रान्वये प्राप्त निर्देशास अनुसरून संदर्भ क्र. 06च्या परिपत्रकान्वये एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या अधिनस्त सर्व प्रशासकीय विभाग, विद्यापीठाची संकुले (चर्चगेट, जुहू, पुणे व श्रीवर्धन), संलग्नित महाविद्यालये व संचलित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था ई. सोमवार दि. 23 मार्च 2020 पासून ते मंगळवार दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

याबाबत संदर्भ क्र. 7 अन्वये गृह विभाग, भारत सरकार यांचेकडून नव्याने प्राप्त निर्देशनास अनुसरून संदर्भ क्र. 8 अन्वये महाराष्ट्र शासनाकडून नव्याने प्राप्त आदेश तथा सूचनेनुसार एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई आस्थापनेवर काम करणारे सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) चा संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादुर्भाव/प्रसार वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून विद्यापीठ, विद्यापीठाची संकुले (चर्चगेट, जुहू, पुणे व श्रीवर्धन), संलग्नित महाविद्यालये व संचलित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, वसतिगृहे ई. **मंगळवार दि. 14/ 04/ 2020** पर्यंत बंद राहतील. या काळात सर्व शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घरी बसूनच आवश्यक ती शैक्षणिक/ प्रशासकीय काम करावित असे आदेश पारित करण्यात येत आहेत.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता महाविद्यालय/विद्यापीठ कार्यालयास एखाद्या शिक्षक/अधिकारी/ कर्मचारयाची गरज भासल्यास कुलसचिव/प्राचार्य/ विभागप्रमुखांच्या आदेशानुसार संबंधित शिक्षक/ अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यालयामधे उपस्थित राहणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन,

.........
डॉ. दिपक देशपांडे,
कुलसचिव,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

प्रत- मा. कुलगुरू/प्र. कुलगुरु/प्राचार्य, संचलित महाविद्यालये व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये/संचालक, मान्यताप्राप्त संस्था/विभाग प्रमुख/ समन्वयक/आवार प्रमुख चर्चगेट, पुणे/जुहू आवार/सुरक्षा अधिकारी/ वसतिगृह अधिक्षक ई.

टिप : सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या अधिनस्थ कर्मचा-यांच्या सदर परिपत्रक निर्देशनास आणून द्यावे तसेच सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

Last modified: 08:47